अपील अधिकारी तथा सामान्य प्रशासन विभाग
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
शिवाजीनगर पुणे ४११००५
दूरध्वनी क्र. ०२०-२५५०११२३
ई मेल aadmcgeneral@punecorporation.org
अपील क्र.५२/२०२३
जा.क्र उआ (सा.प्र.)/ आस्था/ 9६४५ दि. 23/04/2023

अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त , सामान्य प्रशासन विभाग, पुणे महानगरपालिका
अपील क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा.उआ(सा.प्र.)/अपिल/५२/२०२३

प्रती,
श्री.अशोक भानुदास कदम,
साडेसतरा नळी रोड, स.नं.२०९,
भागीरथी नगर, सुभाष मंडप डेकोरेटर्स गल्ली
हडपसर, पुणे - ४११०२८

यांस

---------------- अपिलार्थी

विरुद्ध

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी**
आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका

श्री.अशोक भानुदास कदम, साडेसतरा नळी रोड, स.नं.२०९, भागीरथी नगर, सुभाष मंडप डेकोरेटर्स गल्ली, हडपसर, पुणे - ४११०२८ (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांनी ऑफलाईन दि.४/५/२०२३ अन्वये प्राप्त झाला आहे.

अपिलार्थी यांचे मूळ अर्जातील माहितीबाबत जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी जा.क्र.जमाअ/आस्था/७००, दि.२५/४/२०२३ अन्वये अर्जास कलम २(च) नुसार आस्थापना विभागातील उप विभाग प्रशासन-४ माहितीच्या प्रती आपणांस देण्यात येईल असे कळविण्यात आले आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचा दि. | माहिती द्यावयाचा अंतिम दि. | अपिलार्थीस उत्तर/माहिती पाठविल्याचा दि. | विलंब दिवस |
| ३१/३/२०२३ | ३१/३/२०२३ | ३०/४/२०२३ | २५/४/२०२३ | ० |

अपिलार्थी यांनी मागितलेली आवश्यक माहिती प्राप्त न झाल्याने अपिल करिता सुनावणी घेणेकामी दि.४/५/२०२३ रोजी ऑफलाईन अर्ज दाखल केलेला आहे.

| अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अपील अर्जाचा दिनांक | अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दि. | अपील दाखल करावयाचा अंतिम दि. | अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | अपील अर्जाच्या विलंब बाबत निवेदन दिले आहे का? |
| ४/५/२०२३ | ४/५/२०२३ | २४/५/२०२३ | होय | -- |

अपिलार्थी यांची दि.२२/०५/२०२३ रोजी सकाळी ११.३० वा. अपिल सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणीस अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी ,आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका हे उपस्थित होते.

## विवेचन

अपिलार्थी यांनी "माहिती चुकीची, भ्रामक, दिशाभूल करणे, तक्रारीचे निवारण न करणे, चुकीचे कलम जोडून माहिती नाकारणे, असमाधानकारक, भ्रामक तक्रार अर्ज केले होते दि.२८/११/२२ व दि.९/१/२०२३ त्याची मुदत होऊन गेली तरी अर्ज निकाली काढले नाही वउत्तर सुद्धा दिले नाही पीएमसी" असे लेखी म्हणणे प्रथम अपिल अर्जात केले आहे.

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग पुणे महानगरपालिका यांनी अर्जास दिलेले उत्तर व अपिलार्थी यांचे लेखी म्हणणे पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | मुद्दा | तपशील |
|---|---|---|
| **दोन वेळा तक्रार अर्ज आपल्या मनपा विभागाला दिले त्याचे कुठले उत्तर मिळाले नाही. त्यामुळे माझे दोन्ही अर्ज निकाली निघाले नाही व विलंब झाला त्यांची माहिती मिळावी.** | | |
| १ | दि.२८/११/२०२२ चा अर्ज व दिनांक ९/१/२०२३ चा २३/११ चा अर्ज आयुक्त कार्यालय येथे दिला होता. दि.९/१/२०२३ चा अर्ज अतिरिक्त आयुक्त कार्यालयाच्या कडे दिला होता या दोन्ही अर्जांचे उत्तर तीन महिने उलटून गेले तरी मिळाले नाही. माझे अर्ज निकाली निघाले नाही याची माहिती RTI मार्फत मिळावी. | अर्जदार यांच्या माहिती अधिकार अधिनियम २००५ चे अर्जासोबत जोडलेल्या सहपत्रामध्ये दि.२८/११/२०२२ रोजी सादर केलेला अर्ज हा महानगरपालिका स्वागत कक्षाकडून शहर अभियंता कार्यालय आणि मालमत्ता व्यवस्थापन विभाग यांचेकडे वर्ग केल्याचे दिसून येत आहे. सदरील अर्ज प्रशासन ४ कडे प्राप्त झालेला नाही.<br>दि.९/१/२०२३ रोजीचा अर्ज प्रशासन ४ कडे प्राप्त झालेला असला तरी, सदर अर्जावर पुढील |

| अ.क्र. | मुद्दा | तपशील |
|---|---|---|
| | | कार्यवाही करणेबाबत वरिष्ठ स्तरावरुन कोणतेही आदेश नोंदविलेले दिसून येत नाहीत. त्यामुळे सदर अर्जावर कार्यवाही करण्यात आलेली नाही.<br>तथापि, अर्जदार यांचेकडून श्री.पंडित शेळके यांचेबाबत करण्यात आलेल्या तक्रारीचे अनुषंगाने श्री.शेळके यांची अतिक्रमण व अनाधिकृत बांधकाम निर्मुलन बिभागाकडे बदली करण्यात आलेली असून श्री.शेळके हे दि.३/३/२०२३ रोजी अतिक्रमण व अनाधिकृत बांधकाम निर्मुलन विभागाकडे प्रत्यक्ष हजर झाल्याच्या अहवालाची प्रत अर्जदार श्री.कदम यांना समक्ष चर्चा करुन देण्यात आलेली आहे. त्यानंतर ही प्रत हवी असल्याने पाने १ देता येतील. |
| २ | सेवा हमी कायदा २०१५ नुसार ७ ते १५ दिवसात अर्ज निकाली काढण्याची तरतूद आहे. तेव्हा सेवा हमी कायद्याचे उल्लंघन केल्यामुळे अर्जाचे उत्तर देणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव, पदनाम, ईमेल आयडी, फोन नं., माहिती मिळावी. अर्ज निकाली वेळेवर काढला नाही अधिकाऱ्यांवर कुठलीही शासकीय कारवाई केली याची माहिती मिळावी.<br>५०० ते ५००० ची कारवाई असते. | प्रशासन ४ कडून कामकाज करण्यात येत असलेल्या कोणत्याही सेवांचे कामकाज महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत अधिसूचित केलेले नाही. |
| ३ | दफ्तर दिरंगाई कायदा २००६ नुसार अर्ज ७ दिवसात निकाली काढायचा असतो वर्ग केला तर ४५ ते ९० दिवसात तेव्हा माझ्या अर्जाचे उत्तर वेळेत दिले नाही. नेमाचे उल्लंघन केले आहे. तेव्हा अधिकाऱ्यांवर आपण रितसर १)शिस्तभंगाची कारवाई २)निलंबनाची कारवाई ३)ठपका ठेवणे ४) पदोन्नती रोखून ठेवणे ५)वेतनवाढ रोखून ठेवणे ६) सेवापुस्तकात नोंद करणे इ.सर्व कारवाई करुन त्याची माहिती मिळावी. | माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ चे पोट कलम (च) अनुसार सार्वजनिक प्राधिकरणाकडे कलम २ (च) मध्ये व्याख्या केलेली माहितीच पुरविणे अभिप्रेत असून कारवाई करणे व कारवाई करुन माहिती पुरविणे याबाबी उपरोक्त व्याख्येमध्ये बसत नाहीत. |
| ४ | मुद्दा नंबर १ नुसार दि.२८/११/२०२२ चे उत्तर मिळाले नाही. हडपसर-मुंढवा क्षे.कार्यालय येथील वरिष्ठ लिपीक यांचा बंगले आरसीसी बांधकामात | अर्जदार यांच्या माहिती अधिकार अधिनियम २००५ चे अर्जासोबत जोडलेल्या सहपत्रांमध्ये दि.२८/११/२०२२ रोजी सादर केलेला अर्ज हा पुणे महानगरपालिका स्वागत कक्षाकडून शहर |

| अ.क्र. | मुद्दा | तपशील |
|---|---|---|
| | आहे. हडपसर माळवाडी गवनी (गायरान मध्ये १६५) सर्वे नंबर मध्ये तेंव्हा शासकीय जागेवर शासकीय अधिकाऱ्यास शासकीय मालमत्तेचा मोहबदला घेता येत नाही तेव्हा शेळके यांच्या बंगल्याची सर्व माहिती मिळावी. कलेक्टर ऑर्डर, पिल्यास पास इंजिनर पिल्यान, तसीलदार समती, पिल्यान शानसन सर्व माहिती मिळावी. | अभियंता कार्यालय आणि मालमत्ता व्यवस्थापन विभाग यांचेकडे वर्ग केल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे यामुद्दयाच्या माहितीसाठी अर्जदार यांचा अर्ज शहर अभियंता कार्यालयाकडे आणि मालमत्ता व्यवस्थापन विभाग यांचेकडे वर्ग करावा लागेल. |
| ५ | ९/१/२०२३ चा अर्ज हडपसर-मुंढवा क्षेत्रिय कार्यालय येथील वरिष्ठ अधिकारी यान ६ अधिकारी व शेळके या सर्वांनी माझ्यावर खोटे आरोप केले आहे. कदम यांनी शेळके यांना समोरुन २५००००लाखाची मागणी केली आसे खोटे आरोप नागरिकावर करणे योग्य नाही. तेव्हा या सर्व आरोपाची चौकशी विभागाकडून चौकशी व्हावी व समक्ष अधिकाऱ्यामार्फत यांची चौकशी व्हावी याची मागणी केली होती. त्याची कुठली चौकशी व कारवाई आपल्या pmc मधील अधिकाऱ्यांनी केली याची संपूर्ण माहिती मिळावी. | दि.९/१/२०२३ रोजीच्या अर्जाच्या अनुषंगाने असणाऱ्या मुद्दाची माहिती वरील मुद्दा क्र.१ च्या माहितीमध्ये समाविष्ट केलेली आहे. |
| ६ | शेळके यांच्यामार्फत व ६ अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार कदम यांच्या शेडवर योग्य अतिक्रमण कारवाई केली असे पत्रक शेळके व अधिकाऱ्यांनी नमूद केले आहे पत्रकात असे नमूद केले आहे. दि.१/१०/२०१३ मध्ये पाटबंधारे विभागाच्या जागेत अतिक्रमण केले असल्यास कारवाई करा तेव्हा २०१३ ला ग्रामपंचायत होती व कारवाई २०२० मध्ये झाली ग्रापंच्यात असतानी ला अधिकार नाही कारवाईचा तेव्हा यांची चौकशी व्हावी व योग्य माहिती मिळावी माझे शासकीय जागेत अतिक्रमण होते तर मग शेळके यांचे सुद्धा शासनाच्या जागेत अतिक्रमण आहे. याची सर्व माहिती मिळावी व कारवाई व्हावी. | अर्जदार यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध होईल अशी कागदपत्रे प्रशासन ४ कडे नाहीत. तथापि अर्जदार यांच्या मुद्यातील बाबी विचारात घेता सदरील अर्ज संबंधित विभागाकडे वर्ग करावा लागेल. |

अपिलार्थी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत जा.क्र.जमाअ/आस्था/७०० दि.२५/४/२०२३ रोजी उपविभाग प्रशासन क्र-४ कडून प्राप्त माहिती जन माहिती अधिकारी, आस्थापना

विभाग, पुणे महानगरपालिका यांनी उपलब्ध करुन दिली असल्याबाबत प्रतिपादन केले. श्री.शेळके यांचेविरुद्ध केलेल्या कारवाईचा अहवाल मिळावा, त्यांचे मालमत्ता विषयी विचारणा केलेली माहिती, परिमंडळमार्फत करण्यात आलेली कारवाई यांचा अहवाल मिळावा म्हणून अपिलार्थी यांनी अपिल अधिकारी यांना विनंती केली. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कक्षेत असलेली माहिती जन माहिती अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी यापूर्वी उपलब्ध करुन देण्यात आली असल्याबाबत नमूद केले. अपिलार्थी यांचे माहितीच्या मागणीशी निगडीत मुद्दे विचारात घेता मुद्दा क्र.१ बाबत जन माहिती अधिकारी यांनी स्वयंस्पष्ट माहिती दिलेली आहे. मुद्दा क्र.२,३ कारवाईच्या अनुषंगाने मागणीचे असून अशी माहिती अभिलेख स्वरुपात उपलब्ध असलेस देता येते, त्यादृष्टीने दिलेली माहिती योग्य आहे. मुद्दा क्र.४ बाबत माहिती अन्य कार्यालयाशी संबंधित असलेने दिलेले उत्तर योग्य आहे. मुद्दा क्र.५ बाबत मुद्दा क्र.१ मध्ये समाविष्ट असलेले उत्तर देणेत आले. सदर मुद्दा पाहता चौकशी व कारवाई व्हावी अशा प्रकारची सदर मागणी आहे, तेव्हा दिलेले उत्तर योग्य आहे. मुद्दा क्र.६ बाबत उत्तर योग्य आहे. सदर विवेचनाअंती पुढील प्रमाणे आदेश करणेत येत आहे.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी अपिलार्थी यांना दिलेले उत्तर योग्य आहे. सबब, सदर अपिल अमान्य करुन अपिल क्र.५२/२०२३ निकाली काढण्यात येत आहे.

23/5/23

(सचिन इथापे)
अपिलीय प्राधिकारी तथा
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका

---

सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या मुदतीत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे-१ यांचेकडे व्दितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतुद आहे.

सदर निकालाची प्रत पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

प्रत/-
जन माहिती अधिकारी,
आस्थापना विभाग,
पुणे महानगरपालिका.